# भारतीय संगीतात साहित्याचे योगदान

**डॉ. वैशाली अरविंद उपाध्ये**
संगीत विभाग,
श्रीमती बिंझाणी महिला महाविद्यालय, महाल,
नागपूर

Crossref DOI –

---

**प्रस्तावना :**

भारतीय संस्कृतीतील चौसष्ठ ललित कलांपैकी संगीत ही अत्यंत प्राचीन व दैवी कला आहे. सर्वात प्राचीन व दैवी कला असणाऱ्या संगीत कलेची अधिष्ठात्री देवता 'देवी शारदा' हीच मुळात 'वीणापुस्तक धारिणी' आहे. भारतीय संगीताला हजारो वर्षांचा इतिहास आहे. संगीत कला म्हणजे ज्ञान, साधना, चिंतन, परंपरा आणि संस्कृती यांचा सुंदर संगम आहे.

1. **संगीत ज्ञानाचे मौखिक परंपरा ते लिखित स्वरूपात जतन :**

प्राचीन काळात संगीताचे शिक्षण प्रामुख्याने गुरु-शिष्य परंपरेतून दिले जात असे. अनेक वर्षे गुरूगृही राहूनच शिष्याला प्रत्यक्षपणे संगीत कला शिकावी लागत असे. त्या काळात लिखित स्वरूपापेक्षा स्मरणशक्ती आणि प्रत्यक्ष अनुकरणालाच अधिक महत्त्व होते; मात्र मौखिक परंपरेवरच अवलंबून राहिले असता काही माहिती कालौघात वा विस्मृतीत जाऊ शकते या शक्यतेमुळे प्राचीन काळातही संगीताचे मूळ असलेल्या 'सामवेद' सारख्या वेदांचे सुद्धा कमलपत्र वा ताडपत्री द्वारे लिखित स्वरूपात जतन केले गेले होते.

कालानुरूप संगीत शास्त्रातील अनेक सिद्धांत, स्वरस्थानांचा सिद्धांत, रागांग, समस्वरूपी रागांमधील सूक्ष्म फरक, श्रुती व स्वरांची स्थाने, स्वरांची प्राचीन नावे, रागांची माहिती, तालव्यवस्था, वाद्यरचना, गायनप्रकार आणि संगीताचा अगदी पौराणिक ते आधुनिक काळातील इतिहास यांचेही दस्तऐवज लिखत स्वरूपात जतन; नाट्यशास्त्र (भरतमुनी), 'दत्तिलम' (दत्तिलम), 'बृहद्देशी' (मतंगमुनी), 'संगीतरत्नाकर' (शार्ङ्गदेव), 'संगीतमकरंद' (नारद), 'स्वरमेलकलानिधी' (रामामात्य), 'रागतरंगिणी' (लोचन कवी), 'संगीत पारिजात' (अहोबल पंडित) अशा अनेक संगीत तज्ञांनी त्यांच्या ग्रंथांद्वारे केले. यामुळे संगीताचे ज्ञान अधिक व्यापकपणे समाजापर्यंत पोहोचण्यास मदत झाली व आजही शास्त्रोक्त पद्धतीने पुस्तक रूपात आपल्याला अभ्यासायला मिळते. विविध माध्यमातून संग्रहित केलेल्या या संकलनाचा सर्वात महत्त्वाचा उद्देश म्हणजे संगीत ज्ञानाचे लिखित स्वरूपात जतन करणे व येणाऱ्या अनेक पिढ्यांसाठी संगीताचे संवर्धन करणे होय. काळानुरूप आलेल्या स्थित्यंतराचे संगीतावरही पडसाद उमटलेले दिसून येतात. सततच्या परकीयांच्या आक्रमणानंतर बदललेल्या सामाजिक परिस्थितीमुळे संगीतातील गीत प्रकारांमध्येही बदल झाले. शास्त्रीय, उपशास्त्रीय, लोकसंगीत,

भक्तिसंगीत, नाट्यसंगीत आणि विविध प्रादेशिक संगीतप्रकार समाजात रुळले. या ज्ञानपरंपरेचे जतन आणि पुढील पिढ्यांपर्यंत हस्तांतरण करण्यामध्ये मौखिक परंपरेबरोबरच पुस्तकांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. भारतीय शास्त्रीय संगीत हे स्वरप्रधान आहे त्यामुळे अभिजात शास्त्रीय संगीतात रागाला अत्यंत महत्त्व आहे. प्रत्येक रागाला स्वतःचे स्वरूप असते, रागांग, वादी, संवादी, थाट, गानसमय ह्या नियमानुसार प्रत्येक रागातील प्रत्येक स्वराचा स्वरलगावही वेगवेगळा असतो, त्यावरच प्रत्येक रागाचे भावविश्व ठरत असते त्यामुळे संगीत कला ही गुरुमुखातूनच ग्रहण करावी लागते. केवळ 'सात स्वरांमध्येच संपूर्ण संगीताची सृष्टी व्यापून उरलेली आहे' हे जरी खरे असले तरी संगीतातील अगाध ज्ञान हे पुस्तक रूपात परिवर्तित झाल्यामुळे संगीत कलेला वरदान ठरले आहे.

**2. विष्णूद्वयांच्या योगदानामुळे संगीतातील कला व शास्त्र यांचा समन्वय :**

स्वातंत्र्यपूर्व काळापर्यंत घराण्यातील अमूल्य अश्या चिजा बंदिशी या इतर घराण्यातील कलाकारांना मिळू नयेत व आपल्या घराण्यातील अमूल्य धरोहर केवळ आपल्या पुरतीच संग्रहित व मर्यादित राहावी, किंबहुना केवळ आपलाच एकाधिकार त्यावर राहावा म्हणून कलाकार जाणिवपूर्वक, चिजा, ख्याल, बंदिशी यासुद्धा संपूर्णपणे मैफिलीत सादर करत नसत. मात्र या घराणेदार चीजा व बंदिशी यांचे भांडार सामान्य कलाकार व येणाऱ्या अनेक पिढ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी व जतन करण्यासाठी पंडित भातखंडे व पंडित पलुस्कर यांनी अक्षरशः काश्मीर ते कन्याकुमारी असे संपूर्ण भारतभर भ्रमण करून अनेक मोठमोठ्या संगीत तज्ञ व घराण्याचे प्रतिनिधित्व करणाऱ्या कलाकारांना भेटून अनेक रागांच्या बंदिशी, विविध तालांमध्ये निबध्द असलेले छोटे व मोठे ख्याल, तराणे, ध्रुपद, धमार, त्रिवट इत्यादी पारंपारिक गीत प्रकार त्यांच्याकडून शिकून त्यांनी स्वतःची स्वरलिपी पद्धत निर्माण केली व या सर्व बंदिशी जशाच्या तशा पुस्तकरूपात स्वरलिपीबद्ध करून ठेवल्या. त्यामुळे विविध घराण्याची वैशिष्ट्ये व विविधता या पुस्तकांमध्ये सामावली गेली. विष्णुद्वयांच्या या महान कार्यामुळे संगीत हे पुनरुज्जीवीत होऊन वैश्विकीकरणाच्या दालनात नक्कीच पोहोचले. त्यांच्या या अमूल्य योगदानाचे संगीत विश्व आजन्म ऋणी राहील हे निर्विवाद सत्य आहे.

**3. संगीत शिक्षक, विद्यार्थी, संशोधक व कलाकारांसाठी पुस्तकाची उपयुक्तता :**

संगीत शिक्षकांसाठी व विद्यार्थ्यांसाठी, पुस्तकांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. संगीताच्या शास्त्र व कला या दोन्हीही विधा एकमेकांना पूरक आहेत व अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत. शासनातर्फे आखून दिलेला अभ्यासक्रम विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी शिक्षक पुस्तकांचा उपयोग करतात व विद्यार्थ्यांनाही स्वअध्ययन करण्यासाठी पुस्तकाचे अनन्यसाधारण महत्व आहे. भारतीय संगीताच्या संदर्भात 'नाट्यशास्त्र', 'बृहद्देशी', 'संगीत रत्नाकर' यांसारख्या प्राचीन ग्रंथांना विशेष महत्त्व आहे. या ग्रंथांमधून त्या काळातील संगीत विषयक विचारांची माहिती मिळते. अशा ग्रंथांमुळे भारतीय संगीताची प्राचीन परंपरा समजण्यास मदत होते. संगीत शिकतांना केवळ गायन किंवा वादनाचा सराव पुरेसा नसतो, यामागील शास्त्रीय तत्त्वे समजून घेणेही आवश्यक असते. स्वर, श्रुती, सप्तक, थाट, राग, जात, वादी-संवादी, अलंकार, ताल, मात्रा, लय, आवर्तन, सम, टाळी आणि काल (खाली ची मात्रा) या संकल्पना पुस्तकांमधून व्यवस्थित समजतात. परीक्षेच्या दृष्टीनेही पुस्तकं अत्यंत महत्त्वाची ठरतात. रागाचे स्वरूप, ताल, परिभाषा, कलाकारांची माहिती, संगीताचा संपूर्ण इतिहास, संगीताचे शास्त्र, संगीतातले विविध गीत

प्रकार - उदाहरणार्थ प्रबंध, ध्रुपद, धमार, ख्याल, टप्पा, हे शास्त्रीय गीतप्रकार, ठुमरी, दादरा, होरी, चैती, सावनी, झुला, कजरी, नाट्यसंगीत इत्यादी उपशास्त्रीय गीत प्रकार भजन, अभंग, गजल, भावगीत, फिल्मी गीत हे सुगम संगीतातले विविध प्रकार तसेच विविध प्रांतातील अनेक लोकगीतांचे प्रकार अशा अनेक गीत प्रकारांनी समृद्ध असलेल्या संगीत विश्वाचेही सखोल ज्ञान विद्यार्थ्यांना पुस्तकांद्वारे मिळण्यास मदत होते; इतकेच नव्हे तर सतार, सरोद, संतूर, वीणा ही तत्‌ वाद्ये, तबला, पखवाज, टाळ, मृदंग ही अवनद्ध वाद्ये, बासरी, हार्मोनियम, शहनाई इत्यादी सुशिर वाद्यांची रचना, त्यांचा इतिहास आणि वादन पद्धती व सुप्रसिद्ध कलाकार इत्यादी माहिती मिळवितांना शासनाद्वारे निश्चित केलेले सिलॅबस व इतर संगीततज्ञांची व कलाकारांची पुस्तके अभ्यासता येतात; याशिवाय, स्वअध्ययन करताना किंवा स्नातकोत्तर संशोधनात्मक लेखन करताना अनेक संदर्भ ग्रंथ, विविध लेखक, संगीततज्ञ व कलाकारांची पुस्तके जसे, संगीत रत्नाकर, भरताचे नाट्यशास्त्र, संगीताचे सौंदर्यशास्त्र, ध्रुपदाची परंपरा, नाट्यसंगीत, 'शुभ्र काही जीव घेणे' ‘ठूमरीचा विकास‘, ‘गौहरजान म्हणतात मला‘, ‘लता सूर गाथा‘, असे विपुल ग्रंथ व पुस्तके अनेक समृद्ध ग्रंथालयात सहज उपलब्ध असतात. संशोधन करताना एका पुस्तकातील माहिती दुसऱ्या संदर्भ ग्रंथांशी पडताळून पाहणेही आवश्यक असते त्यामुळे विद्यार्थ्यांचे संशोधन चिकित्सक आणि तर्कशुद्ध तर होतेच, शिवाय स्वतःच्या पेपर प्रेझेंटेशन वा पुस्तकांच्या लेखनातील विश्वासार्हता सुद्धा निश्चित होते.

### 4. डिजिटल युगातील आव्हाने :

आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात संगीताचे ज्ञान केवळ छापील पुस्तकांपर्यंतच मर्यादित राहिलेले नाही तर ई-बुक डिजिटल ग्रंथालय ऑनलाइन जर्नल्स आणि अनेक शैक्षणिक संकेत स्थळामुळे संगीत विषयक माहिती आज सहज घरबसल्या आपल्याला उपलब्ध झालेली आहे; तरीही माहितीची विश्वासार्हता तपासणे आवश्यक आहे. इंटरनेटवरील प्रत्येक माहिती अचूक असेलच अशी खात्री देता येत नाही त्यामुळे विद्यार्थ्यांनी विश्वसनीय पुस्तकं, संशोधन ग्रंथ आणि मान्यता प्राप्त शैक्षणिक स्त्रोत्रांचाच आधार घेण्याची गरज आहे.

### निष्कर्ष :

कितीही स्थित्यंतरे आली, कितीही काळ बदलला तरी ज्याप्रमाणे कलाकारांना व विद्यार्थ्यांना गुरूंचे मार्गदर्शन व प्रत्यक्ष सहवास याशिवाय संगीतकला साध्य होऊ शकत नाही त्याचप्रमाणे अगदी AI चे यूग जरी आले तरी पुस्तकांची उपयुक्तता कालातीत व अबाधित आहे असेच म्हणावे लागेल.

### संदर्भसूचि :

- संगीताचे सौंदर्यशास्त्र – डॉ. अशोक रानडे
- भारतीय संगीत परंपरा आणि आधुनिकता – डॉ. संजीव कुमार शर्मा